# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०७/०४/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

### अपघातात मृत्यु

.पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील जैस्वाल देशी भटी जवळ गणेशपूर येथे दिनांक ०६/०४/२०२२ चे ०८.३० वा. ते ०९.०० वा. सुमारास **शिला अंकुश निकूडे (मृतक) वय ३४ वर्ष, रा. टाकळघाट** ही एमएच– ३१/सीए– ६०९६ क्रमांकाच्या स्टार बसमध्ये टाकळघाट येथून बसून गणेशपूर येथे कंपनीत जात असतांना जैस्वाल देशी भटी समोर सदर बस ही हळू झाल्याने ती बसचे खाली उतरण्याच्या बेतात असतांना सदर बस चे चालक आरोपी नामे– मुन्ना पांडुरंग चौधरी, वय ३६ वर्ष, रा. डेग्माखुर्द, ता. हिंगणा जि. नागपूर याने आपली बस पून्हा वेगात चालविल्याने ती सदर बस चे दरवाज्यातून खाली पडून तिच्या डोक्याला गंभीर ईजा झाल्या. तिला उपचारासाठी माया हॉस्पीटल बुटीबोरी येथे दाखल केले असता उपचारा दरम्यान दिनांक ०६/०४/२०२२ चे १३.०० वा. मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– लक्ष्मण रामचंद्र आदे, वय ५४ वर्ष, रा. टेभंरी ता. हिगंणा जि. नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४, ३(१)/१८४, ५/१८० मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री राय ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत अर्धा कि मी अंतरावरील मौजा अरोली येथे दिनांक ०५/०४/२०२२ चे १६.५१ वा. ते ०७.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रमेशकुमार जी लिल्हारे, वय ५२ वर्ष, रा. अरोली यांना अज्ञात आरोपीने ऑनलाईन रिक्वेस्ट पाठवुन त्यांचे अकाउंट आयडी व अकाउंट नंबर विचारले. ते फिर्यादीने सांगीतले तसेच डेबीट कार्डचे १४ अंक सांगुण फिर्यादीचे अकाउंट मधुन २५,०००/–रू. कमी झालेचे मॅसेज आला नंतर लगेच २५,०००/–रू. व ५०,०००/–रू. कमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ६६(सी), ६६(डी) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री. जोशी मो.क्र. ७८७५९६६६७६ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. पारशिवनी :— **सौ धनवंता कवडू सहारे (मृतक), वय ३० वर्ष रा. पटगोवारी ता. रामटेक** हिचा विवाह कवडू सहारे यांच्यासोबत फेब्रुवारी २०१२ मध्ये झाले होते. दि. ०४/०४/२२ चे ११.०० वा. सुमारास मौजा नयाकुंड शिवार भगवानजी कंभाले यांचे शेतामध्ये मृतक ही शेतात काम करित असतांना तिने अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केल्याने तिची प्रकृती खराब होऊन ती शेतात बेशुध्द झाली. तिला उपचाराकरिता प्रथम ग्रामीण रूग्णालय रामटेक व नंतर मेयो हॉस्पीटल नागपूर येथे नेले असता उपचारादरम्यान दि. ०४/०४/२२ रोजी १६.४५ वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. मर्ग चे कागदपत्रे मेयो हॉस्पीटल नागपूर येथुन पो.स्टे. पारशिवनीला प्राप्त झाल्याने सदरील मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार प्रदीप ठाकुर मेयो पोलीस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील पोउपनि श्री दिलीप बासोडे मो.न. ९८२३०८३९०५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर